# राष्ट्रीय आरोग्य अभियान, हिंगोली

जाहिरात क्रं. 01/2022

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत जिल्हा आरोग्य सोसायटी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली अंतर्गत खालील प्रमाणे कंत्राटी तत्वावर रिक्त पदे भरावयाची आहेत.

| अ. क्रं. | पदाचे नांव (कार्यक्रम) | रिक्त पदे | नियुक्तीचे ठिकाण | शैक्षणीक अर्हता | प्रतिमाह घ्यावयाचे सत्र | मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 01 | योग प्रशिक्षक | 01 | आयुष आरोग्य वर्धिनि केंद्र वारंगा फाटा ता. कळमनुरी जि. हिंगोली | Diploma in Yoga Science & Naturopathy | 05 | प्रति योग सत्र रु.500/- |

## अटि व शर्ती

1. सदर पदांची नियुक्ती ही निव्वळ कंत्राटी स्वरुपाची असुन योगसत्रानुसार वरिल तक्त्यात नमुद प्रमाणे अदा केले जाईल. ही पदे राज्यशासनाची नाहीत. नियुक्ती कालावधी महिण्यातुन 05 सत्र घेणा बंधनकारक आहे. एका दिवशी एकच सत्र घ्यावे. प्रति आठवडा एक सत्र असे एकुण 5 सत्र घ्यावयाचे आहेत.
2. केंद्र शासनाने संबंधित पद नामंजुर केल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता उमेदवाराची सेवा समाप्त करण्यात येईल त्या बाबत उमेदवारास काहीही कळविले जाणार नाही.
3. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी कर्मचा-यांना मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांचे परिपत्रकानुसार सोबत दिलेल्या नमुण्यात प्रतिज्ञापत्र (लहान कुटुंब प्रमाणपत्र) नमुना अ नुसार अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. प्रतिज्ञापत्र सोबत नसल्यास अर्ज ग्राह्य धरल्या जाणार नाही.
4. अर्जा सोबत 1) वयाचा पुरावा (TC) 2) पदवी/ पदविका प्रमाणपत्र 3) शेवटच्या वर्षाची गुणपत्रीका 4) कॉन्सील रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र. (As Per Applicable) त्याशिवाय अर्ज पात्र होणार नाहीत. 5) शासकीय/NHM अनुभव प्रमाणपत्र (खाजगी अनुभव ग्राह्य धरल्या जाणार नाही.) 6) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र एवढीच कागदपत्रे जोडावीत. परिपुर्ण भरलेले अर्ज दिनांक 19/9/2022 ते 28/9/2022 या कालावधीत सुट्टीचे दिवस वगळता प्रत्यक्ष कार्यालयात कार्यालयीन वेळेत NHM कक्ष, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली सादर करावीत.
5. अर्जदारावर कोणत्याही प्रकारचा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद नसावा किंवा कोर्टातील दावे इ. दिसुन आल्यास संबंधित अर्जदाराची निवड झाल्यास किंवा निवड आदेश दिल्यानंतर गुन्हा बाबत कळाल्यास त्याची निवड किंवा निवड आदेश तात्काळ रद्द करण्यात येतील.
6. राष्ट्रीय आरोग्य अभियानातुन सेवा समाप्त (अकार्यक्षम/अनियमीतता) केलेल्या कर्मचा-यांनी पुन्हा पदभरतीसाठी अर्ज करु नये

Rojgar Marathi.com

Scanned by CamScanner

7. जुने अर्ज किंवा इतर कोणत्याही पदभरती जाहिरातीचे अनुषंगाने केलेले अर्ज ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. किंवा त्याचा कोणताही विचार केला जाणार नाही.
8. उमेदवारांनी प्रत्यक्ष कार्यालयात संपर्क करु नये. प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष दबाव आणणा-या उमेदवारास भरती प्रक्रियेतुन बाद करण्यात येवुन पोलीस कार्यवाही करण्यात येईल.
9. सदर पदे निव्वळ कंत्राटी स्वरुपाची असल्याने एकत्रित वेतनाशिवाय अन्य कोणताही भत्ता लागु नाही. सदर पदे महाराष्ट्र शासनाची नाहीत त्यामुळे नियमीत करण्यासाठी दावा किंवा हक्क करता येणार नाही.
10. निवड प्रक्रिया संबंधी कोणताही निर्णय घेण्याचे सर्व अधिकार निवड समितीने राखुन ठेवण्यात आलेले आहेत.
11. दिलेल्या कालावधीत रुजु न झाल्यास त्यांची निवड आपोआप संपुष्टात येईल. निवड झालेल्या कोणत्याही उमेदवारांची नियुक्ती सेवा कालावधी रद्द करण्याचा, स्थगीत करणे, निवडी व नियुक्ती प्रक्रीया कोणत्याही टप्प्यापर कारण न देता बदल, रद्द करणे अथवा चालु ठेवण्याचा अंतिम अधिकार निवड समिती अध्यक्ष यांचेकडे राखुन ठेवला आहे.या बाबत दावा दाखल करता येणार नाही.
12. सद्यस्थित कोविड-19 चा प्रादुर्भाव असल्यामुळे मास्क, सॅनिटायझर, अंतर इ. बाबींचे पालन करावे. निवड प्रक्रिया संबंधी कोणताही निर्णय घेण्याचे सर्व अधिकार निवड समितीने राखुन ठेवण्यात आलेले आहेत. निवड झालेल्या उमेदवारांनी 7 दिवसाच्या आत नियुक्ती ठिकाणी रुजु होणे आवश्यक आहे.
13. उमेदवारांनी परिपुर्ण भरलेले अर्ज विहित वेळेतच <u>राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद हिंगोली</u> येथे दिनांक 28/9 /2022 पर्यंत सादर करावेत. तदनंतर आलेल्या अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

| जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक<br>एन.एच.एम. हिंगोली | जिल्हा आरोग्य अधिकारी<br>जिल्हा परिषद हिंगोली |
|---|---|

Rojgar Marathi.com

Scanned by CamScanner